# ०९ - मुहूर्तादि संज्ञा

वस्तुतः फलज्योतिषामध्ये मुहूर्त इत्यादिकांचा अंतर्भाव करावयास पाहिजेच असे नाही. परन्तु व्यावहारिक दृष्टया ही माहिती महत्वाची असल्याने संक्षेपाने देत आहे.

ह्या प्रकरणामध्यें मुहूर्त कसा काढतात ह्याची सूक्ष्म गणिती माहिती , वेध वगैरे न देतां , जननशांती करणे केव्हां आवश्यक , मुंज लाभते किंवा नाही कसे पहावे इत्यादि संक्षेपाने देत आहे.

<u>जननशांती :</u>

मूल जन्माला आले असता कोणकोणत्या प्रसंगी शांत करणे इष्ट असते ती माहिती पुढीलप्रमाणे.

<u>तिथी ः</u> क्षयतिथि , कृष्ण चतुर्दशी , अमावस्या.

<u>नक्षत्र ः</u> - आश्लेषा , ज्येष्ठा , मूळ ,
चित्रा ( पूर्वार्ध )
पुष्य ( द्वितीय व तृतीय चरण )
उत्तरा ( प्रथम चरण )
पूर्वाषाढा ( तृतीय चरण )
मघा ( प्रथम चरण )
विशाखा ( चतुर्थ चरण )
रेवती ( अखेरच्या दोन घटिका )
अश्विनी ( पहिल्या दोन घटिका )

( टीप ः एक घटिका म्हणजे २४ मिनिटे )

<u>योग ः</u> - वैधृति व व्यतिपात
<u>अन्य ( अ )</u> भद्रेचा काल , ग्रहणपर्वकाल व मृत्यु योग. हे अन्य योग ज्या दिवशी असतील त्या दिवशी पंचांगात तसा स्पष्ट उल्लेख असतो.
<u>अन्य ( आ )</u> जुळी मुले जन्माला येतात तेव्हा ( यमल )
मुलाला जन्मतः दात असतो तेव्हा ( सदंत जन्म )
अधोमुख जन्म :

माता व पित्याच्या जन्म नक्षत्रावर जन्म असेल तर , तीन मुलांनंतर मुलगी व तीन मुलींनंतर मुलगा ह्या संबंधी जननशांती कोणती व कशी करावयाची याची माहिती पुरोहितांस विचारावी.

मात्र गोमुख प्रसवशांती करताना बालकाला गाईच्या पायामधून काढू नये. कित्येकदां पुरोहित अशा त-हेचा विधि करतात ते चुकीचे असून त्यामुळे मूल जखमीसुद्धा होऊ शकेल. श्री दाते ( सोलापूर पंचांग ) ह्या विषयीं वारंवार लिहीत असतात. शांती ‘ गो मुख प्रसव ’ शांती आहे.

गुरूबल ः - मुंज व लग्नकार्यामध्ये गुरूबल आहे किंवा नाही ते पहिले जाते .
जन्मराशीपासून गुरू २ / ५ / ७ / ९ / ११ असता गुरूबल आहे .
१ / ३ / ६ / १0 असता गुरूच्या सुवर्ण प्रतिमेचे पूजन करावे .
४ / ८ / १२ असता गुरूबल नाही , परन्तु कार्यकरणे आवश्यकच असल्यास गुरूचा जप – पूजा व शांती करून नंतर कार्य करावे .

चंद्रबल : विवाहामध्ये वधूवरांच्या व मौंजीबंधनामध्ये बटूच्या जन्म राशींपासून मुहूर्ताच्यावेळचा चंद्र कोणत्याही पक्षात १ / ३ / ६ / ७ / १0 असता चंद्रबल आहे व शुक्ल पक्षात वरील उल्लेखिलेल्या चंद्राशिवाय २ / ५ / ९ असतां ही चंद्रबल आहे असे समजावे .

अष्टमलग्न दोष : मुहुर्ताचे वेळचे लग्न वधूवरांच्या वा बटूच्या जन्मलग्नापासून आठवे असल्यास तो मुहूर्त लाभत नाही असे समजावे .

गुरू - शुक्राचे अस्त : गुरू व शुक्र ह्यांचा अस्त असल्यास विवाहास ते दिवस पूर्णतः वर्ज्य असतात .

पित्यास रविबल ः मौंजी बंधनकाली पित्यासही रविबल असावे . रवि जन्मराशीपासून ३ / ६ / १0 / ११ असता शुभ असतो .

घाताष्टक ः घाताष्टक फक्त द्यूत , प्रवास , राजदर्शन व यात्रा यानांच वर्ज्य मानावे . घातचक्र म्हणून विवाहास व मौंजीबंधनास वर्ज्य नाही .

ह्या सर्व विवेचनामध्ये मुहूर्त कसा काढतात ही माहिती दिलेली नाही . पंचांगामध्यें दिलेले मुहूर्त लाभतात किंवा नाही एवढयापुरतेच विवेचन मर्यादित ठेवले आहे .